## प्रकरण पहिले

# मराठी कादंबरीची पूर्वपीठिका

# प्रकरण पहिले

## मराठी कादंबरीची पूर्वपीठिका

१८५० पर्यंत हिंदुस्थानात ब्रिटीश राजवटीचा अंमल सुरु झाला. ब्रिटीशांनी आपल्या बरोबर आपले वाङ्‌मयही हिंदुस्थानात आणले. त्याची कारणे कोणतीही असोत पण भारतात शिक्षणाचा प्रसार करण्याचे धोरण स्वीकारले. मध्यमवर्ग शिकू लागला. अनेक शाळा महाविद्यालये चालू केली. ज्ञानाची कवाडे खुलू लागली. यातूनच इंग्रजी वाङ्‌मयाचा अभ्यास काहीजण करू लागले. कादंबरी या वाङ्‌मयप्रकाराचा उगम इंग्रजी वाङ्‌मयाच्या अनुकरणातून झाला. कादंबरी हा प्रकार लोकांना आवडतो हे सिध्द होऊ लागले. अनेक कादंबऱ्या प्रसिध्द होऊ लागल्या. इंग्रजी, हिंदी, अरबी, भाषेतील पुस्तकाची भाषांतरे प्रसिध्द होऊ लागली. ब्रिटीश काळात पाश्चात्य संस्कृतीचा हिंदू संस्कृतीशी संयोग झाला. त्यातूनच बाबा पद्मनजी यांनी १८५७ मध्ये " यमुनापर्यटन" ही मराठीतील पहिली कादंबरी लिहिली. समाजातील प्रश्न मांडण्यासाठी त्यांनी काही निश्चित नैतिक भूमिका घेऊन कादंबरीच्या माध्यमातून भाषिक कृती केलेली आहे. वाचकांची अद्भुत कथा कादंबरीची आवड लक्षात घेऊन इ. स. १८६१ मध्ये लक्ष्मणशास्त्री हळबे यांनी " मुक्तामाला" नावाची अद्भुतरसप्रधान कादंबरी लिहिली. त्यानंतर त्यांनीच "रत्नप्रभा" ही दुसरी कादंबरी लिहिली. या कादंबऱ्यांनी अफाट लोकप्रियता मिळवली.

त्यामुळेच अद्भुत व शृंगाररसप्रधान कादंब-यांची संख्या वाढू लागली. "विश्वासराव" व " वसंतकोकिळा" या कादंब-याही लोकप्रिय ठरल्या.

कादंबरी या वाङ्‌मयप्रकाराची पाहणी करताना कादंबरीचे स्वरूप, तिच्या रंजनात्मकतेचे स्वरूप व बोधवादाचे स्वरूप लक्षात घेणे गरजेचे ठरते. मराठी साहित्यात "कादंबरी" हा वाङ्‌मयप्रकार इंग्रजी राजवटीत जन्माला आला. तसे पाहिले तर गोष्ट सांगणे आणि गोष्ट ऐकणे ही मानवाची पुरातन प्रवृत्ती आहे. पुराणे, आख्याने, बखरी इत्यादी ग्रंथांतून कादंबरीची काही अंगोपांगे जाणवतात हे खरे आहे. १८२९ मध्ये प्रसिध्द झालेल्या " महाराष्ट्र भाषेचा कोश" या ग्रंथात कादंबरी या शब्दाचा अर्थ" एक कल्पित कथा" असा दिला आहे.

मराठी कादंबरीचा इतिहास १५० वर्षे इतका जुना आहे. कादंबरी हा प्रकार इंग्रजी साहित्यावरून मराठीत आला. " कादंबरी हा इंग्रजीतील " नॉव्हेल " साठी वापरला जाणारा प्रतिशब्द आहे. कादंबरी हे नाव बाणभट्टाच्या " कादंबरी " या ग्रंथावरून रूढ झाले. युरोपमध्ये कादंबरी १८ व्या शतकात उदयाला आली. चीनमध्ये १५ व्या शतकात उदयाला आली. इतरत्र ती कोठेही आढळत नाही असे " डायना स्पिअरमन" आपल्या " नॉव्हेल अँण्ड सोसायटी" या ग्रंथात म्हणतात"[१] इंग्रजी शिक्षणाने स्वसमाजातील दोष दिसू लागले. ते दूर करण्यासाठी उपाय सुरु झाले आणि याचवेळी मराठीतील पहिली कादंबरी " यमुनापर्यटन" अथवा "हिंदु विधवांच्या स्थितीचे निरूपण" ही बाबा पद्मनजी यांची कादंबरी १८५७ मध्ये प्रसिध्द झाली.

" कादंबरी " हा वाङ्‌मयप्रकार महाकाव्यासारखा आहे. महाकाव्याप्रमाणे कादंबरीमध्ये एखादया देशातील लोकसमूहाचे विस्तृत स्वरूपाचे जीवनचित्रण केलेले असते. त्यांचे यश, अपयश, सुखदुःखे, रूढी, परंपरा, आशा-आकांक्षा, धर्मसंस्कृतीच्या अनेक महत्त्वाच्या गोष्टी

ज्याप्रमाणे महाकाव्यात प्रतिबिंबित होतात, तशा त्या कादंबरीतही प्रतिबिंबित होतात.

मराठी साहित्यातील एक समृध्द दालन म्हणजे मराठीकादंबरीचे विश्व होय. अखिल भारतीय पातळीवर मराठी व बंगाली साहित्य हे समृध्द मानले जाते. अनेक लेखकांनी विविध विषय हाताळलेले आहेत. तत्कालीन समाजजीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्याचा यशस्वी प्रयत्न लेखकांनी केला आहे. त्या त्या काळच्या समाज जीवनाचे प्रतिबिंब तत्कालीन कादंबरीत दिसून येते. सामाजिक आणि राष्ट्रीय पातळीवर ज्या लाटा उसळल्या त्या लाटांचे चित्रणही आपणास मराठी कादंबरीत पहावयास मिळते. अद्भुत कादंब-या, सामाजिक समस्या हाताळणा-या कादंब-या, कौटुंबिक समस्यांचे चित्रण करणा-या कादंब-या, चरित्रात्मक कादंब-या अशा अनेक पदरांनी युक्त असलेले मराठी कादंबरीविश्व मनाला भुरळ घालते.

कादंबरी या वाङ्.मयप्रकारात लेखकाची जीवनदृष्टी महत्त्वाची असते. या जीवनदृष्टीच्या व्यापकतेवर सखोलपणावर आणि मौलिकतेवर कादंबरीची महत्ता अवलंबून असते. ही जीवनदृष्टी संपन्न बनविण्यासाठी लेखकाचे सूक्ष्म जीवननिरीक्षण माणसाच्या मनोव्यापाराच्या गुंतागुंतीचे त्याचे ज्ञान, जीवन व्यापाराचे आकलन इत्यादी गोष्टी महत्त्वाच्या असतात. लेखकाची जन्मजात प्रतिभेची झेप आणि त्याची व्युत्पन्नता व अभ्यास यांनी जीवनदृष्टी समृध्द बनत असते. कादंबरीत काही व्यक्तींच्या द्वारा लेखक जीवनाचे आपले निरीक्षण व आकलन प्रकट करत असतो. जीवनातले तरल क्षण पकडण्यापासून ते संपूर्ण समाजजीवनाचे दीर्घकालीन जीवनचित्रण करण्याचे सामर्थ्य कादंबरी वाङ्.मयात आहे.

कादंबरी हा साहित्यप्रकार आधुनिक असला तरी त्याचे बीज फार जुने आहे. समाज जीवनाशी व्यापक नाते जोडणारा असा हा वाङ्.मयप्रकार आहे. या वाङ्.मयप्रकाराचे स्वरूप विस्तृत व सखोल आहे. कादंबरी सदृश गदय कथात्मक साहित्य महाराष्ट्रात अकराव्या शतकात "लीळाचरित्रांच्या रूपाने निर्माण झाले आहे. " लीळाचरित्रामध्ये

छोटया छोटया कथा गुंफलेल्या असून म्हाईभट्टांनी चक्रधरांची जीवनकथा सलग तीन विभागात वर्णन केलेली आहे. आजच्या कादंबरी वाङ्.मय प्रकाराची वैशिष्टये आपणास " लीळाचरित्रा" मध्ये दिसतात.

कादंबरीचे स्वरूप, उद्दिष्टे, तंत्र व मंत्र , यांची खूप चर्चा झाली आहे. साहित्य व समाज यांचे संबंध, कलावाद, जीवनवाद, नवमतवाद, व्यक्तिवाद, साहित्याची लोकाभिमुखता, साहित्याचे प्रयोजन, साहित्य व राजकारण, साहित्य व तत्त्वज्ञान, साहित्य व साहित्येतर कला इत्यादी वादांची जी रणधुमाळी माजली ती मुख्यत्वेकरून कादंबरी या वाङ्.मयप्रकाराच्या क्षेत्रात.

निरनिराळया काळात लोकांच्या कादंबरीविषयीच्या अपेक्षा भिन्न-भिन्न आहेत. कादंबरीचे स्वरूप कसे असावे यासंबंधी अनेक लेखकांनी आपले विचार मांडले आहेत. तर कांहीनी कादंबरी या वाङ्.मय प्रकाराला " जीवनाचा आरसा" असे संबोधले आहे.

## कादंबरीचे स्वरूप :

कादंबरी या वाङ्.मयप्रकाराची पाहणी करतांना कादंबरीचे स्वरूप तिच्या रंजनात्मकतेचे स्वरूप व बोधवादाचे स्वरूप लक्षात घेणे गरजेचे ठरते. तसे पाहिले तर कादंबरी हा वाङ्.मयप्रकार इतका सर्वसमावेशक आहे की त्याला व्याख्येच्या चौकटीत पकडणे शक्य नाही. कादंबरी म्हणून त्याचा आपण उल्लेख करतो. त्या सर्व कादंब-यांचे व्यवच्छेदक लक्षण स्पष्ट करणे आजही कठीण होऊन बसले आहे.

मराठी कादंबरीच्या स्वरूपाविषयी सर्व प्रथम विचार का. बा. मराठे यांनी मांडला आहे. ते म्हणतात " जसे नाटकात तसे नावलात, काळ वेळ व स्थळ ही एकत्र असले पाहिजे"[२] कादंबरीची व्याख्या करण्याचा प्रयत्न आजवर अनेकांनी केला आहे. या व्याख्या करतांना कादंबरीच्या

वेगवेगळ्या अंगावर भर दिला आहे. विशाल अशा मानवी जीवनाचे चित्रण करणा-या कादंबरीचे स्वरूप गुंतागुंतीचे असल्याने तिला व्याख्येत बांधणे कठीण आहे. त्यामुळे तिच्या व्याख्येत विविधता आली. कादंबरीच्या अनेक घटकांपैकी अनेक किंवा एका वैशिष्टयावर विशेष भर देऊन या व्याख्या तयार झाल्या असल्याचे आपल्या ध्यानात येते. खरे म्हणजे कादंबरीचे व्यवच्छेदक लक्षण स्पष्ट करणे आजही कठीण होऊन बसलेले आहे.

कादंबरी वाङ्.मयास " जीवनाचा आरसा " असे पुष्कळ वेळा म्हणण्यात येते. परंतु संसाराचा विस्तार इतका मोठा व मानवी जीवन इतके गुंतागुंतीचे आहे की कादंबरी वाङ्.मय हे जीवनाचे प्रतिबिंब रूप असले तरी कोणतीही गोष्ट जीवनाचे संपूर्ण प्रतिबिंब असणे शक्य नाही. असू शकत नाही. त्यामुळे चंद्रकांत बांदिवडेकर लिहितात- "कादंबरी हा वाङ्.मयप्रकार इतका लवचिक, प्रसरणशील आणि सर्व समावेशक आहे की त्याचे स्वरूप सांगता आले तरी त्याच्या सीमारेषा निश्चित करणे कठीण आहे."[3]

इंग्रजी राजवटीने या देशात जसे सामाजिक व भौतिक परिवर्तन घडवून आणले. तसा भारतीय साहित्यावरही इंग्रजी साहित्याचा प्रभाव पडला. शिक्षणप्रसार व मुद्रण-कलेचाही विकास झाला. त्यामुळे वाचकांच्या संख्येत वाढ झाली. तसेच जीवनाचे नवोन्मेष व्यक्त करण्याची जी आवश्यकता निर्माण झाली ती पूर्ण करण्याचे कार्य कादंबरी वाङ्.मयाने केले. असे जरी असले तरी मदन कुलकर्णी लिहितात- "कादंबरी हा वाङ्.-मयप्रकार म्हणून पाश्चात्य असला तरी " कादंबरी " हा शब्द मात्र अस्सल भारतीय आहे."[4]

कादंबरीला सत्यसृष्टीचा आधार असतो. पण सत्यसृष्टीचे दर्शन घडविताना लेखकाला स्थळ-काल प्रसंगादी बाबतीत विशेष लक्ष देऊन निवड करावी लागते. एका कादंबरीत लेखक फार तर काही व्यक्ती आणि त्यांच्या जीवनातील काही प्रसंगाच्या घटनांच्या आधारेच आपली कृती निर्माण करतो. त्यामुळेच बापट प्र. वा, ना. वा. गोडबोले लिहितात

" सत्यसृष्टीचे सम्यकृदर्शन घडविण्यासाठी रटाळ जीवनातील सर्वच प्रसंगाचे तो वर्णन करील त्याची कादंबरी नीरस ठरेल"[५]

ना. सी. फडके यांनी " एखाद्या व्यक्तीची इच्छा अनेक अडीअडचणीतून अनेक संकटातून मार्ग काढून कशी सिध्दीस गेली अगर तिची कशी मोडतोड झाली याची कहाणी म्हणजे कादंबरी"[६] अशी कादंबरीची व्याख्या केली आहे. कादंबरी म्हणजे केवळ इच्छा-पूर्तीचे कथन नव्हे. त्याहूनही अधिक असे काही कादंबरीत असते. परंतु त्याचा विचार या व्याख्येत नाही. त्यामुळे ही व्याख्या परिपूर्ण वाटत नाही.

जे. बी. प्रिस्टले यांनी " काल्पनिक पात्रे व घटना यांचा परामर्श घेणारा गद्य कथाप्रकार "[७] अशी कादंबरीची व्याख्या केली आहे. या व्याख्येत कादंबरीच्या कथात्मकता आणि निवेदनात्मकता या घटकांबरोबरच पात्रे व घटना या महत्वाच्या घटकांचाही निर्देश आला आहे. तथापि कादंबरीची सर्वमान्य अशी व्याख्या कोणीही करू शकलेले नाही. कारण बदलत्या काळाप्रमाणे कादंबरीच्या स्वरूपात बदल झालेले दिसून येतात. एक बाब लक्षात घेतली पाहिजे ती अशी की कादंबरीतून चित्रित होते ते प्रामुख्याने मानवी मन, मानवी जीवन, परंतु माणूस प्रत्यक्षात जगत असलेले जीवन आणि कादंबरीतील जीवन यातील भेद लक्षात घेतला पाहिजे. प्रत्यक्ष जीवनातील अनेकविध घटकांच्या पसा--यातून लेखक काही निवड करीत असतो. कादंबरीत चित्रित होणारे जीवन प्रत्यक्षातील जीवन नसते हे खरेच परंतु ते जीवनासारखे असते. जीव-नाशी संवादी असते. म्हणूनच प्रत्येक चांगल्या कादंब-यांतून आपणास जीवनाचा प्रत्यय येत असतो.

या संदर्भात कुसुमावती देशपांडे लिहितात, " पार्थिव संसारा-विषयीची आस्था ही कादंबरीची वृत्तीजीवनाचे कानेकोपरे चौकसपणे

धुंडाळते, तत्वचिंतनाचा किंवा अद्भुताचा मार्ग धरून मुलतः मानवी प्रश्नांचा विचार करणे हा कादंबरीचा आधार किंवा तिची मुख्य सामुग्री ही वृत्ती, हा दृष्टिकोण, हे अनुभव वा कल्पना जिवंत व्यक्तिचित्रणांच्या व एका विस्तृत आकर्षक कथानकाच्याद्वारे कादंबरीची पध्दती व्यक्त करणे".[८] या व्याख्येद्वारे कादंबरीचे स्वरूप समजण्यास मदत होते.

गंगाधर गाडगीळ यांनी म्हटले आहे की " कादंबरीची रचना संघराज्यासारखी असते. कादंबरीमध्ये अनेक केंद्रे असतात. वेगवेगळ्या घटकांतून रचलेल्या अनुभवांच्या अनेक स्वायत्त संघटना असतात. या संघटना परस्परबध्द असतात. पुष्कळदा तिच्यातील भिन्न कथासूत्रे परस्परांच्या प्रगतीला मदत करतात. मात्र असे नेहमीच असते असे नाही. कधी-कधी या भिन्न कथासूत्रातील पात्रांचा आणि त्यांच्या कृतींचा व्यावहारिक संबंध अत्यल्प असतो गौण असतो अगर मुळीच नसतो पण ते काही असले तरी कोणत्याही कादंबरीतील या स्वायत्त अनुभव संघटनांचा परस्परांशी कलात्मक संबंध मात्र निश्चित असतो".[९]

कादंबरीची सर्व समावेशक आणि नेमकी अशी व्याख्या करण्याचा प्रयत्न भालचंद्र नेमाडे यांनी केला आहे. त्यांच्या मते, " कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली आशयसूत्राचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग, अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत. अशी साहित्यकृती असते. कादंबरीच्या या सर्व गोष्टीमुळे एखादी मोठी कृती साकल्याचे मांडता येते. सामाजिक आशय विशाल असावा लागतो.... एखादया समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासहित मांडलेला असतो. संस्कृतीचे ....तपशीलासह दर्शन घडविलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छेद घेतलेला असतो. आशय सूत्रे बळकट असतात. पात्रे सलग उभी असतात".[१०]

नेमाडयांच्या या व्याख्येमध्ये कादंबरीच्या अनेकविध वैशिष्टयांचा समावेश आहे. ही व्याख्या अत्यंत समर्पक व सार्थ आहे. म्हणून ती जास्तीत जास्त स्वीकारार्ह वाटते. कारण कादंबरीत खंडिततेपेक्षा....

प्रसंगाच्या परिपूर्ण चित्रणांची आवश्यकता अधिक असते.

कादंबरीच्या कथाबीजाची प्रकृती एकदा निश्चित झाल्यानंतर सेंद्रिय एकात्मतेच्या तत्त्वानुसारच त्याचा विकास होत असतो. घटना, प्रसंग आणि व्यक्ती हे घटक परस्परांशी अतूट असा संबंध प्रस्थापित करूनच कथासूत्राला अपरिहार्यपणे पुढे पुढे खेचीत नेतात. म्हणजे कादंबरीच्या त्या घटकांमध्ये असा विकास घडवून आणण्याचे सामर्थ्य असावे लागते. कल्पीत कथेत नेमके याउलट घडते. तेथे कथासूत्रात अंतर-करित्या फुलण्याची शक्ती नसते. तिच्यातील घटना-प्रसंग आणि व्यक्ती केवळ गोष्टकर्ता सांगेल तसा आकार घेत असतात. म्हणूनच प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांनी कादंबरीची दिलेली व्याख्या " कार्यकारण शृंखलाबद्ध अशा कल्पित कथानकाच्या द्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडवणारी सविस्तर ललितगद्य कथा म्हणजे कादंबरी."[११] अपूर्ण वाटते. कारण या व्याख्येत घटनांच्या कार्यकारणभावाला महत्त्व दिलेले असून तो लावून दाखविणे महत्त्वाचे मानले आहे.

कादंबरी हे आपल्या काळाचे चित्र असते असे मानल्यानंतर तिच्यात सामाजिक जीवन आशय . . रूपाने येणे अपरिहार्य ठरते. सामाजिक वास्तव हेच कादंबरीचे आशयद्रव्य असते. व्यक्ती सामाजिक वास्तवात जगत असते. व्यक्ती-व्यक्तीचे परस्परांशी जे संबंध येतात त्यातच सामाजिकता असते. कारण व्यक्ती ही व्यक्ती म्हणून वेगळी नसून ती सामाजिक वास्तवाचा भाग असते. सामाजिकतेशिवाय व्यक्तीच्या जीवनाला अर्थपूर्णता लाभत नसते. म्हणून कादंबरीत व्यक्ती-कुटुंब-समाज असे संबंध रेखाटले जातात. कादंबरीत काही विशिष्ट व्यक्तीचे जीवन चित्रित होत असले तरी शेवटी त्यातून मानवी स्वभावच चित्रित झालेले असतात. अशा रीतीने तो मानवी मनाचाही शोध ठरतो.

सामान्यपणे लेखक कादंबरीच्या अनेक पद्धतींचा, रचना प्रकारांचा

तंत्रकौशल्यांचा आवश्यकतेप्रमाणे उपयोग करून कादंबरीचा जीवनानुभव प्रभावीपणे व परिणामकारकपणे रेखाटण्याचा प्रयत्न करतो.

अशा प्रकारे कादंबरीच्या विविध व्याख्यांच्या आधारे आपण कादंबरीची स्वरूपवैशिष्टये लक्षात घेतली. त्यावरून कादंबरी हा वास्तवाधिष्ठित साहित्यप्रकार आहे असा निष्कर्ष आपणास काढता येतो.

## मराठी कादंबरी वाङ्‌मयाचे स्वरूप :

आधुनिक मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासात १८८५ पर्यंतचा कालखंड स्थूलमानाने " अव्वल इंग्रजी " कालखंड किंवा " भाषांतरयुग " या नावाने ओळखला जातो. " कादंबरी " हा वाङ्‌मय प्रकार मराठीत १८५७ ते १८८५ या काळात उदयास आला. मराठी कादंबरी वाङ्‌मयाचा प्रारंभ म्हणजे पाश्चात्य साहित्याचा परिणाम होय. एक वाङ्‌मयप्रकार म्हणून कादंबरी हा वाङ्‌मयप्रकार पाश्चात्य असला तरी कादंबरी हा शब्द अस्सल भारतीय आहे. लक्ष्मणशास्त्री हळबे यांनी " मुक्तामाला" ही कादंबरी १८६१ साली लिहिली. त्यानंतर नारो सदाशिव रिसबूड यांच्या " मंजुघोषा", "विश्वासराव ", " वसंतकोकिळा" या कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या. ग. वि. कानेटकरांनी " रूपसुंदरी ", " राजहंसविजया" इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. केशव लक्ष्मण जोशेकर यांनी " विचित्रपुरी " ही कादंबरी १८७० मध्ये लिहिली.

याच काळात ऐतिहासिक कादंबरीचा उदय झाला. स्वदेशाच्या इतिहासाबद्दल जागृती होऊ लागली. पराक्रमी पूर्वजांविषयी अभिमान वाटू लागला. सांस्कृतिक प्रगतीच्या अवस्थेत असताना अद्‌भुतता रमणारे मराठी मन एकदम वास्तववादी न बनता मध्ये काही काळ ते ऐतिहासिक कथेच्या रमणीय प्रदेशात रमले. १८७१ मध्ये रा. भि. गुंजीकरांनी " मोचनगड" ही ऐतिहासिक कादंबरी लिहिली आणि ऐतिहासिक कादंबरीचे युग सुरु झाले.

इंग्रजी शिक्षणामुळे स्वसमाजातील दोष दिसू लागले. ते दूर करण्यासाठी उपाय सुरु झाले. त्यावेळी लोकांची अभिरूची ऐतिहासिकतेकडून वास्तवतेकडे वळली. बाबा पद्मनजी यांनी लिहिलेली " यमुनापर्यटन " (१८५७) ही मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी आहे. मराठीतील पहिली सामाजिक कादंबरी हीच होय. १८७९ मध्ये म. वि. रहाळकर यांची " नारायणराव व गोदावरी" सामाजिक कादंबरी प्रसिध्द झाली. महाराष्ट्रातील मध्यम वर्गाचे वास्तवदर्शी चित्रण करण्यात या कादंबरीने चांगले यश मिळवलेले आहे. मराठी कादंबरीचे पहिले मानकरी म्हणून या लेखकांचा उल्लेख करावा लागतो. पुढे या वाङ्‌मयप्रकाराला स्वतंत्र, आकर्षक व सुसंघटित स्वरूप प्राप्त होत गेले.

मराठी कादंबरीचा आरंभकाल १८५७ जरी असला तरी १८८५ पासून हरिभाऊंच्या कादंबरीमुळे मराठी कादंबरीचे कलात्मक व बोधात्मक ऐश्वर्य अनेक पटीने वृध्दिंगत झाले. मराठी कादंबरीची प्राथमिक अवस्था संपुष्टात येऊन तिचे स्वातंत्र्य प्रौढ आणि प्रभावी स्वरूपात प्रकट होत गेले. स्वतंत्र सामाजिक कादंब-यांचे जनक म्हणून कीर्ती मिळवलेल्या हरिभाऊंनी कादंबरी लेखनाचा पहिला धडा इंग्रजी कादंबरीचे भाषांतर करून गिरवला. पहिली कादंबरी " मधली स्थिती " मध्ये पुण्यातील समाजजीवन रंगविताना त्यांनी पांढरपेशा समाजाची आचार-विचार या दृष्टीने झालेली पडझड स्पष्ट केली आहे. " गणपतराव " ही त्यांची दुसरी कादंबरी. या कादंबरीत पुण्यातील ब्राह्मण कुटुंबाचे चित्रण केलेले असून त्यातील स्त्रियांच्या दु:खाची कहाणी त्यांनी सांगितलेली आहे. एकूण जीवनातील दु:ख,त्यात स्त्रियांचा वाटा याचे वर्णन आले आहे. स्त्री - पुरूषांच्या सुख-दु:खाच्या कहाणीबरोबर सामाजिक सुधारणेचेचे ध्येय हा विषय हरिभाऊंच्या " पण लक्षात कोण घेतो " या कादंबरीत चित्रीत झाला आहे. स्त्री सुधारणावादी दिशा देऊन परिवर्तनाची आवश्यकता सूचित केली आहे. " यशवंतराव खरे " ही राजकीय विचारधारा मांडणारी कादंबरी आहे. " भयंकर दिव्य", "मायेचा बाजार "," जग हे असे आहे",

" कर्मयोग " या त्यांच्या कादंबऱ्या प्रसिध्द आहेत. मराठीतील या थोर कादंबरीकाराने प्रथमच वाङ्मयात आत्मानुभूतीचा जिव्हाळा निर्माण केला. हरिभाऊंची प्रतिमा थोर, सहानुभूतीने ओथंबलेल्या कलावंताची आहे. त्यांची भाषा शब्दांची नसते तर संवेदनांची असते.

हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यांतील वास्तववादवाद व ध्येयवाद यांचे सहज साहचर्य अत्यंत रम्य आणि स्फूर्तिदायक आहे. हरिभाऊंच्या सर्वच कादंबऱ्यांचे वैशिष्ट हे की, त्या जशा कथानकप्रधान तशाच व्यक्तिदर्शनप्रधानही आहेत. त्यांच्या कादंबरीवर " सदाशिव पेठी " असा शिक्का मारला गेला असला तरी स्त्रीशिक्षण, विधवा विवाह इत्यादी सामाजिक सुधारणांचे प्रतिबिंब त्यांच्या कादंबरीत पडले आहे. त्यांनी ऐतिहासिक कादंबऱ्याही लिहिल्या त्यातही आदर्श मूल्यांचे दर्शन घडविण्याचा त्यांचा हेतू स्पष्ट दिसतो. दुःखद कहाणीचे मूळ स्त्रोत रंगवित असतानाच सामाजिक परिवर्तनाची दिशा स्पष्ट करणारा हा कलावंत व्यक्ती आणि समाज यांची अतूट महती सांगून जातो.

हरिभाऊंची " वज्राघात" ही उत्कृष्ट ऐतिहासिक कादंबरी आहे. तिला स्वयंपूर्ण, सुसंघटित कथावस्तू आहे. " वज्राघात" ही केवळ विजयनगरच्या विनाशाची कहाणी नाही तर मानवी मनाची कहाणी आहे.

मराठी कादंबरीचा महत्वाचा दुसरा टप्पा म्हणजे वामन मल्हार जोशी आणि श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या कादंबऱ्या हा होय. तत्वचर्चात्मक कादंबरी म्हणून वामन मल्हार जोशी यांची कादंबरी महत्वाची ठरली. यांच्या कादंबरी लेखनानेही मराठी कादंबरीला विचारसामर्थ्य मिळवून दिले. " सत्यनिष्ठा" ही जोशी यांच्या विचारशीलतेची प्रमुख आधारशक्ती आहे. त्यांच्या " रागिणी " या कादंबरीत, देशप्रेम, धर्मप्रेम, स्त्रीस्वातंत्र्य, विधवाविवाह, शारीरिक प्रेम, आणि आत्मिक प्रेम इत्यादी जिव्हाळ्याच्या विषयावर चर्चा आली आहे. त्यांच्या "आश्रमहरिणी", " सुशीलेचा देव ", " इंदू काळे सरला भोळे " या कादंबऱ्यामधून हा अनुभव येतो. स्त्रीच्या जीवनाची झालेली कोंडी वामन मल्हारांना

जाणवली आणि ती फोडण्याचे कार्य त्यांनी वैचारिक पातळीवर आणि सुधारणावादाच्या विषयी असलेल्या ध्येयवादाच्या भूमिकेतून केले आहे. मराठी कादंबरीचे कलावैभव जरी ते फारसे वाढवू शकले नाहीत. तरी मराठी कादंबरीचे तत्व वैभव वाढविण्यात जोशी यांनी यश मिळवले आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रीय विचारवंतावर ज्या सुखवादी, व्यक्तिवादी मतांचा पगडा होता. त्यांच्या मर्यादा दाखवून विसाव्या शतकातील तिस-या दशकात समाजवादी विचारांचे स्वागत जोशी करतात. खाजगी मालमत्तेकडून सामाजिक मालमत्तेच्या कल्पनेकडे, अंधश्रध्दांकडून विवेकशील आचार धर्माकडे आणि स्त्रीच्या शोषणावर आधारलेल्या कुटुंबव्यवस्थेकडून विश्वकुटुंबाच्या संकल्पनेकडे वाचकाला आणतात. कादंबरीकार या नात्यानी त्यांनी वैचारिक विकास घटनांच्या व व्यक्तींच्या अनुभवातून दाखविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

या कालखंडात डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी १९२६ पासून १९३७ पर्यंत कादंबरी लेखन केले. त्यांच्या कादंब-यांचे स्वरूप वैचारिक आहे. " गोंडवनातील प्रियंवदा", " परागंदा", " आशावादी", " गावसासू ", " ब्राह्मणकन्या", " विचक्षणा", " भटक्या" या आपल्या कादंब-यातून त्यांनी समाजातील अक्करमाशा संततीचे भवितव्य, पुनर्विवाहाचे योग्यायोग्यत्व, प्रणयविवाह, परजातीतील विवाह, विधवाविवाह यासारख्या सामाजिक प्रश्नांचे चित्रण केले आहे.

कथानकाची प्रमाणबध्दता, आवश्यक तेवढीच पात्रे, परिणामकारक व्यक्तिरेखा इत्यादी गुण त्यांच्या " ब्राह्मणकन्या" या कादंबरीत दिसून येतात. " गोंडवनातील प्रियंवदा" या कादंबरीत पुनर्विवाहाची समस्या मांडली आहे. केतकरांनी अधर्म्य संतती, पतीत स्त्रिया, कलावंतीणीच्या जीवनातील दुःखे अशा काही प्रश्नांना वाचा फोडली. केतकरांनी महाराष्ट्रापासून अमेरिकेपर्यंत समाजदर्शनाचा परीघ वाढवला. उपेक्षित समाजातील

माणसांच्या मनाची हालचाल व्यक्त केली. मराठी कादंबरी जोमदार सकस व वास्तववादी बनवली. त्यांच्या कादंब-यांच्या रुपाने मराठी कादंबरीने प्रगतीचा एक नवा व पुढला टप्पा गाठला.

कलात्मक रंजनाकडे खेचला जाणारा वर्ग एकूण वाचक वर्गाच्या संख्येत नेहमी अधिक असतो. " बहुसंख्य" वाचकांना स्वप्नपूर्तीचे समाधान देणारी मनोरंजनात्मक कादंबरी प्रा. ना. सी. फडके यांनी लिहिली. " जादूगार", " दौलत", " अटकेपार", " कुलाब्याची दांडी", "निरंजन", " अखेरचे बंड" अशा अनेक कादंब-यातून त्यांनी समाजजीवनातील वैवाहिक प्रश्न सहानुभूती दृष्टिकोणातून पूर्ण मांडलेले आहेत. आपल्या कादंब-यातील पात्रांच्या जीवनातून व कथानकातून वास्तवतेचा भाग उत्पन्न व्हावा व त्याबद्दल वाचकांना आत्मीयता वाटावी म्हणून प्रा. फडके त्यात तत्कालीन राजकारणाचे व समाजकारणाचे प्रवाह आणून सोडतात.

या काळात कलेसाठी कला, जीवनासाठी कला, राजकीय प्रचारासाठी कला, नैतिक मूल्यांच्या जपणुकीसाठी कला, दलितांच्या उध्दारासाठी कला असे अनेक वाद उसळले, " हृदयाची हाक ", " कांचनमृग ", " दोन ध्रुव", " उल्का", " हिरवा चाफा", " दोन मने ", " पांढरे ढग", "रिकामा देव्हारा", " सुखाचा शोध ", " पहिले प्रेम ", "क्रौंचवध ", " अमृतवेल " या सा-या कादंब-यांतून खांडेकरांना वाटणारी दीनदलितांच्या उध्दाराबद्दलची मन:पूर्वक तळमळ आणि स्वार्थत्यागसंपन्न ध्येयवादित्वाबद्दलची आत्यंतिक ओढ प्रकट झालेली आहे. एकंदरीत समाजाच्या प्रगतीतील पोषक ठरतील अशा तत्वांचे दर्शन घडविण्याच्या हेतूनच खांडेकरांची प्रत्येक कादंबरी जन्मास आलेली आहे. खांडेकरांनी मराठी कादंबरीला जीवनवाद शिकविला. ध्येयदृष्टी आणि सृष्टी दिली. तिचे आशयविश्व सखोल आणि समृध्द केले.

खांडेकरानी कादंब-यांतून वाचकांच्या मनावर ध्येयवाद, आदर्शवाद यांचे संस्कार घडविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या कादंब-यावरही शेवटी रंजकतेच्या मर्यादा पडल्या आहेत. कारण खांडेकरही रंजनासाठी ठराविक तंत्राच्या आहारी गेले. त्यांची कादंबरी एकूण वाङ्‌मयावर प्रभाव टाकू शकली नाही.

१९२०-४७ या काळात गांधीवादी विचारधारा अतिशय महत्वाची विचारधारा म्हणून मान्यता पावली आणि तिने जवळजवळ सर्वच भारतीय साहित्यावर कमी-जास्त स्वरूपाचा प्रभाव टाकला. गांधीवादाने मराठी कादंबरीवर प्रभाव टाकला आहे असे दिसून येते.

ग. त्र्यं. माडखोलकर यांनी " मुक्तात्मा", " भंगलेले देऊळ ", " शाप", " कांता", " दुहेरी जीवन", " मुखवटे ", " नवे संसार", "नागकन्या", " डाक बंगला", " चंदनवाडी " या कादंब-या लिहिल्या आहेत. माडखोलकर हे मराठीतील पहिले आणि प्रमुख राजकीय कादंबरीकार आहेत. त्यांच्या कादंबरीमध्ये राजकीय पार्श्वभूमी आणि विचारसरणी असली तरी प्रणयरम्यता हा त्यांच्या कादंबरी लेखनाचा गाभा आहे. "विधवाकुमारी ", " धावता धोटा", " कुलदैवत", " शिपायाची बायको " या कादंब-यातून वरेरकरानी समाजजीवनाच्या विविध स्तरांवरील अगदी आजतागायतचे विविध प्रश्न मांडून मराठी कादंबरीचे विषय-क्षेत्र व्यापक केले आहे.

श्री. पु. य. देशपांडे यांनी " बंधनाच्या पलीकडे ", " सुकलेले फुल", " सदाफुली ", " विशाल जीवन", "काळी राणी" या कादंब-या लिहिल्या आहेत. यांच्या कादंब-यात प्रेमासंबंधी एक आगळी दृष्टी व्यक्त झाली आहे. प्रेम या संकल्पनेचा त्यांनी कादंब-यांतून केलेला विचार महत्त्वाचा आहे.

स्वप्नरंजन, ध्येयवाद यानंतर मराठी कादंबरी वाङ्‌मयाने वास्तवतेच्या दिशेने वाटचाल केलेली आहे. स्त्रियांचे ज्वलंत प्रश्न त्यांची सुखःदुखे

यांच्या जवळपास जाणा-या स्त्री कादंबरीकारांची एक पिढी निर्माण झाली. विभावरी शिरूरकर यांची " हिंदोळ्यावर" ही कादंबरी प्रसिध्द झाली. या कादंबरीतून स्त्रियांचे दुःख, यातना, कष्ट, भावना या सा-यांचे उत्कटपणे चित्रण केले आहे. "विरलेले स्वप्न " या कादंबरीत श्रीमंत म्हणून जन्मूनही दीन-दुबळ्या गरिबांच्या सेवेकरिता तळमळणा-या नायकाच्या राजकीय आशा-आकांक्षांचे सरस चित्रण आहे. त्यांची " बळी " ही कादंबरी गाजली आहे. गुन्हेगार मानल्या गेलेल्या जमातीच्या जीवनाचे तारांच्या कुंपणापलीकडे रहाव्या लागणा-या मांग-गारूडी या जमातीच्या जीवनाचे अतिशय वास्तव, अतिशय सूक्ष्म चित्रण या कादंबरीत आहे. मालतीबाई बेडेकरांनी स्त्रियांच्या वैवाहिक समस्याचे चित्रण " वठलेला वृक्ष ", " फेरीवाला", " निखळलेली हिरकणी " या कादंब-यात केले आहे. सिंधू गाडगीळ यांची " क्षितिजावर" ही वैमानिकांच्या जीवनावर आधारलेली कादंबरी हृदयस्पर्शी आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे स्त्रीजीवनात जी परिवर्तने झाली त्याचेच पडसाद उमटले आहेत.

विश्राम बेडेकर यांची " रणांगण" ही कादंबरी वास्तवतेच्या अधिक जवळ जाणारी कादंबरी आहे. " रणांगण" ही युध्दकथा नाही. युध्दामुळे उद्ध्वस्त झालेल्या एका तरुणीची " प्रणयकथा" आहे. " रणांगण" ने मराठी कादंबरीला नवा मार्ग दाखवला.

" रात्रीचा दिवस" ही मर्ढेकरांची कादंबरीही माणसांच्या सुप्त मनाचे चित्रण करते. जीवनातील विविध अनुभव घडलेले प्रसंग यांचे चित्रण " तांबडी माती " या कादंबरीत आले आहे. " पाणी " या कादंबरीत खेडयातील एका कुटुंबातील तीन पिढयांचे जीवन व त्यांच्यावर झालेल्या दोन महायुध्दांच्या आणि धरण बांधण्याच्या योजनेचा परिणाम यांचे चित्र आहे. खेडुतांच्या जीविताचे सहृदय आणि परिणामकारक चित्रण करणारी त्यांची कादंबरी आहे. त्यांच्या कादंबरीमध्ये मानवी जीवनाची अगतिक अवस्था प्रकट होते. जीवनानुभवांचे

सखोल चित्रण, विलक्षण समर्थ भाषाशैली आणि संज्ञाप्रवाह पध्द-तीची अमोल देणगी या गोष्टी मर्ढेकरांच्या कादंबरीने मराठी कादंबरी विश्वाला दिल्या.

ग्रामीण कादंबरीचा उदय :

१९३० पर्यंत मराठी साहित्य शहरी, मध्यमवर्गीय कक्षेतच अडकले होते. त्यातच फडके, खांडेकर यांनी या काळात कादंबरी रचनेचे काही संकेत रूढ करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. शहरातील मध्यमवर्गीय वाचकांचे मनोरंजन, स्वप्नरंजन प्रमाण मानून त्यांनी आपले कादंबरी लेखन केले. या काळातील बहुसंख्य लेखकवर्ग शहरातील असल्याने कादंब-रीतील जीवनचित्रण शहरी मध्यमवर्गीय भावनानुभवाच्या कक्षेपलीकडे जात नव्हते. या काळातील मराठी कादंबरी मनोरंजनाच्या आवर्तात सापडली होती.

अशा या काळात ना. वि. कुलकर्णी, वि. स. सुखटणकर यांनी ग्रामीण आणि प्रादेशिक चित्रणांचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. या साहित्याची मुख्य प्रेरणा वास्तवचित्रणाची होती. तसेच या लेखकांजवळ नवे अनुभव विश्व शोधण्याचा आणि आविष्कृत करण्याचा आत्मविश्वास होता. र. वा. दिघे यांनी आपल्या कादंबरीत आपण शहरी पध्दतीचे जीवनचित्रण करणार नसून मराठमोळा, रांगडा आणि ग्रामीण प्रणय दाखविणार आहोत. असे आश्वासन वाचकांना दिले आहे. तसेच आपण वास्तव जीवनाचे चित्रण करीत आहोत, असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. अशाप्रकारे प्रादेशिक साहित्याचा जन्मच मुळात वास्तववादी प्रवृत्तीतून झाला आहे. वास्तवचित्रण ही प्रादेशिक साहित्याची प्रवृत्ती आहे.

या नव्या लेखकांचे विशेषतः प्रादेशिक कादंबरीकाराचे अनुभव विश्व सांकेतिक कादंबरी जीवनाहून वेगळे होते. नवे लेखक नव्या अस्पर्शित, आकर्षक, मुक्त, सकस, रांकट जीवनाच्या दिशेने जाऊ लागले. श्री. र. वा. दिघे यांनी या नव्या क्रांतीचे यशस्वी निशाण रोवले. प्रादेशिकता नव्याने जन्मली नाही. तशी ती संस्कृत नाटकात विशिष्ट पात्राच्या बोलण्यात मराठी संत साहित्यात, लावणी वाङ्मयात, वरेरकर, खांडेकरांच्या कादंबऱ्यात, रविकिरण मंडळाच्या जानपद गीतात या ना त्या स्वरूपात होतीच पण प्रादेशिक कादंबरीत त्या जाणिवा अधिक सखोल आणि स्पष्ट झाल्या. तिला स्वतंत्र, स्वयंभू, जीवनव्यापी रूप आणि मूल्य लाभले.

मराठी कादंबरीच्या वाटचालीचा लक्षात घेण्यासारखा टप्पा म्हणजे ग्रामीण कादंबरी होय. र. वा. दिघे यांची " पाणकळा" प्रसिध्द झाली आणि मराठी कादंबरीच्या सृष्टीत एका चांगल्या कलाकृतीची भर पडली. दिघे यांच्या प्रादेशिकतेत चमत्कारिक कृत्रिम लेखनशैली मिसळली आहे. रोमँटिक मनोवृत्तीने ते भारलेले असल्यामुळे त्यांच्या लेखनात वर्णनांना कल्पनारम्यतेची भरजरी झालर लाभते. शेतकरी जीवन पाणकळ्यावर कसे सर्वस्वी अवलंबून असते ते रंगविले आहे. "पाणकळा" आणि " सराई " या प्रादेशिक कादंबऱ्या लिहून दिघे यांनी मराठीतील ललित शब्दसृष्टीत निसर्गरम्य उपवने फुलविली आहेत. कोकणातील शेतकरी जीवनाशी ते स्वतः समरस झाले असल्यामुळे कोणत्याही जातिवंत रसिकाचे चित्त वेधून घेणारे सामर्थ्यही या कादंबऱ्यांना प्राप्त झाले आहे.

ग. ल. ठोकळ यांनीही " गावगुंड" ही अशाच प्रकारची कादंबरी लिहिली. या कादंबरीतील ग्रामीण जीवन १९४२ मधील सातारयाकडील दहशतवादी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर रंगविण्यात आले. लेखकाची ग्रामीण जीवनाच्या अंतरंगाशी ओळख असल्यामुळे या कादंबरीतील एकंदर व्यक्तिदर्शन सरस आणि जिवंत उतरले आहे.

श्री. ना. पेंडसे यांची पहिली कादंबरी " एल्गार" यातील ताम्हणपेंडी गावाचे चित्रण जिवंत आहे. " हद्दपार" या कादंबरीतही कोकणातील दापोली तालुक्यातील एक खेडे त्याच्या पूर्णरंगारूपासह सजीव साकार होते. या कादंबरीत अधिक महत्त्व नायकाला-राजेमास्तरांना आहे. एखादया महापराक्रमी विरांच्या जीवनात जी असामान्यता आणि भव्यता प्रतीत होते ती या सामान्य शिक्षकाच्या जीवनात साकार झाली. " गारंबीचा बापू " ही पेंडसे यांची महत्त्वाची आणि लोकप्रिय कादंबरी " यशोदा", " हत्या", " कलंदर" या सर्वच कादंब-यांतील अस्सल कोकणी भाषा या प्रादेशिक जीवनाला सजीव व समूर्त करते. त्यांची निवेदनशैली साधी सरळ आहे. पेंडसे यांच्या कादंबरीमुळे मराठी कादंबरी नव्याने कलात्मक होऊ लागली आणि तिच्या आकलनात नव्याने निर्मळ-पणा, स्वयंभूपणा दिसू लागला. त्यामुळे पेंडसे महायुध्दोत्तर काळाचे सर्वात महत्त्वाचे प्रतिनिधी ठरतात.

श्री. गो. नी. दांडेकर यांच्या " शितू " या प्रादेशिक कादंबरीत रसरशीत प्रादेशिकतेचे दर्शन घडते. विशिष्ट सामाजिक परिस्थितीमुळे शितूसारख्या निष्पाप, निरपराध, निरागस, मुलीच्या जीवनाची कुचंबणा, होते, अवहेलना होते याचे चित्रण कादंबरीत आहे. दांडेकरांना प्रादेशिक कादंबरीकार म्हणून उदंड कीर्ती मिळाली.

व्यंकटेश माडगूळकरांची " बनगरवाडी " ही कादंबरी म्हणजे कादंबरी मराठी प्रादेशिक कादंबरीतील महत्त्वाचा टप्पा आहे. ही कादंबरी सर्वार्थाने खरी प्रादेशिक कादंबरी स्पष्ट होतेच पण " बनगरवाडी" हीच या कादंबरीत मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे.

र. वि. जोशी यांच्या " रानभूल " या प्रादेशिक कादंबरीमध्ये निजामाच्या संस्थानी राजवटीमधील रझाकारी अत्याचारांचे मन सुन्न करणारे चित्रण आहे. एकूण प्रादेशिक कादंबरीने आपल्या लोकप्रियतेची

परमतीमा गाठली आहे. साहित्यात न पाहिलेले जीवन न पाहिलेली माणसे व न वापरलेली भाषा आल्यामुळे कादंबरी विश्व नवचैतन्याने भरून गेले.

उध्दव शेळके यांनी आपल्या कथा कादंब-यातून विदर्भातील वास्तव पकडण्याचा प्रयत्न केला आहे. " बाई विना बुवा", " धग ", " डाळिंबाचे दाणे " या कादंब-यामधून शेळक्यांच्या लेखणीचा आविष्कार झाला आहे.

त्यानंतरच्या काळात शंकर पाटील यांची " टारफुला" ही कादंबरी प्रसिध्द झाली. तसेच रणजित देसाई यांच्या " माझा गाव", " बारी ", " स्वामी " यासारख्या कादंब-या प्रसिध्द झाल्या. या कादंबरीतील घटना-प्रसंगही लक्षात राहतील असे विलक्षण आणि नाटयपूर्ण आहेत. " माझा गाव " ही वास्तव घटनांवर आधारलेली कादंबरी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील एक जुने गाव उभे करावे असे रणजित देसाई यांना वाटले. प्रत्येक माणसांच्या छोटया खेडयात दुस-याशी कसा संबंध असतो. गाव कसे एकसंघ असते. जुन्या ग्रामरचनेतील माणूस स्वत:ला समाजाशी कसा वाहून घेत असतो. एकूण सगळं गाव कसे जगत असे हे दाखविण्यासाठी त्यांनी " माझा गाव " ही कादंबरी लिहिली.

आनंद यादव यांची " गोतावळा", ना. धों. महानोरांची गंधारी", तसेच रा. रं. बोराडे यांची " पाचोळा" या अत्यंत लक्षणीय कादंब-या आहेत. आनंद पाटील यांनी " कागद " आणि "सावली" अशा काही महत्त्वाच्या व उल्लेखनीयकादंब-या लिहिल्या आहेत.

१९२० ते ६० नंतर मराठी कादंबरीचा अनेक दिशांनी विकास झाला. ती वेगवेगळया क्षेत्रातील जीवनानुभवांचे आकलन करण्याचा प्रयत्न करू लागली. ग्रामीण, प्रादेशिक, दलित, राजकीय, ऐतिहासिक, पौराणिक अशा अनेक दिशांनी मराठी कादंबरी प्रयोगशील

झाली. मराठी कादंबरी १९६० नंतर ख-या अर्थाने प्रौढ झाली.

अण्णाभाऊ साठे यांची " फकिरा", गो. नी. दांडेकरांची " शितू " अशा एकामागोमाग एक कितीतरी कादंब-या मराठीत लिहिल्या गेल्या आहेत. " टारफुला " ( शंकर पाटील ) इंधन ( हमीद दलवाई ) अशा अनेक महत्त्वाच्या कादंब-या( १९६० ते १९६६) या काळात प्रसिध्द झालेल्या आहेत. १९६० नंतर मराठी कादंबरी सर्वार्थाने फुलून आली आहे. तिचा ख-या अर्थाने विकास झाला आहे.

फडके-खांडेकर निर्मित सौंदर्यवादी कादंबरीला प्रादेशिक, ग्रामीण, जनवादी दलित अशा शाखा कशा कशा फुलल्या हे वरील कादंब-या-मधून लक्षात आले.

१९६६ नंतरच्या ग्रामीण कादंबरीच्या प्रवाहातही समृध्द अशी भर पडलेली आहे. आनंद यादव ( गोतावळा ) रा. रं. बोराडे ( पाचोळा) या कादंब-यांनी ग्रामीण कादंबरीचा इतिहास घडविला आहे. नागनाथ कोत्तापल्ले यांचा विचार ग्रामीण कादंबरीच्या या प्रवाहातच करावा लागतो. ग्रामीण जीवन चित्रित करण्याची जिद्द बाळगून लेखन करण्याचा प्रयत्न करणारे जे लेखक मराठी साहित्यात आहेत. त्यामध्ये नागनाथ कोत्तापल्ले यांचा समावेश होतो.

## सारांश :

अशाप्रकारे या कादंबरी वाङ्‌मयप्रकाराची सुरुवात कशी झाली याचा विचार आपण केला. कादंबरी या वाङ्‌मयप्रकाराचे स्वरूप पाहत असताना वेगवेगळ्या समीक्षकांनी कादंबरी विषयी केलेल्या व्याख्या लक्षात घेतल्या तसेच ग्रामीण कादंबरीचा उदय कसा झाला याविषयी विचार केला. पुढील प्रकरणात नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कादंबरीवाङ्‌मयाकडे वळायचे आहे.

## संदर्भ-टीपा

| | |
|---|---|
| १. स्पिअरमन, डायना | द नॉव्हेल ॲण्ड सोसायटी रोलेज ॲण्ड केगन पॉल, लंडन १९६६, पृ. क्र. ३७७. |
| २. मराठे, का. बा. | कादंबरी ग्रंथमाला, प्रकाशन मुंबई, १९७२, पृ. क्र. १३३. |
| ३. बांदिवडेकर, चंद्रकांत | मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, ११२६, सदाशिव पेठ, पुणे, ३० आवृत्ती पहिली १९८९, पृ. क्र. २. |
| ४. कुलकर्णी, मदन | मराठी प्रादेशिक कादंबरी, ( तंत्र आणि विकास) श्री. मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, आवृत्ती पहिली १९८४, नागपूर २, पृ. क्र. २, ८७. |
| ५. बापट, प्र. वा. आणि गोडबोले, ना. वा. | मराठी कादंबरी, (तंत्र आणि विकास) व्हीनस प्रकाशन, पुणे, शनिवार पेठ आवृत्ती तिसरी सप्टेंबर १९७३, पृ. क्र. ३०, ३७, ३५. |
| ६. फडके, ना. सी. | प्रतिभा-साधन अंजलीप्रकाशन, पुणे पृ. क्र. ९५ आवृत्ती आठवी १९६३. |

७. प्रिस्टले, जे. बी. केतकरी कादंबरी, ( दुर्गा भागवत )
मौज प्रकाशन गृह मुंबई,
आवृत्ती पहिली १९६७, पृ. क्र. ७.

८. देशपांडे, कुसुमावती मराठी कादंबरीचे पहिले शतक,
मुंबई मराठी साहित्य संघ, आवृत्ती दुसरी
१९७५, पृ. क्र. १६.

९. गाडगीळ, गंगाधर साहित्याचे मानदंड,
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,
आवृत्ती पहिली १९६२, पृ. क्र. २०७.

१०. नेमाडे, भालचंद्र टीकास्वयंवर,
साकेत प्रकाशन, औरंगाबाद,
आवृत्ती पहिली १९९०. पृ.क्र. १९८.

११. कुलकर्णी, श्री. मा. कादंबरीची रचना,
उन्मेष प्रकाशन, नागपूर १९५६,
आवृत्ती पहिली १९८६,
पृ. क्र. १५.